**प्रतिवादीं तर्फे उलटतपास – श्री. डी. जे. देसाई वकील.**

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, ग्रा. मि. क्र.४७६ पुर्वी माझ्या वडिलांच्या नावे होती. सदर मिळकत सन २००० पर्यत माझ्या वडिलांच्या नावे होती. तिचा सन २००१ पर्यंत ग्रा. मि. क्र.१९१ होता. सदर मिळकत दि.१२.०२.२००४ रोजीच्या ठरावाने माझ्या नावे झाली आहे. सन २००४ साली तिला ग्रा. मि. क्र.३७० देण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठरावाने माझ्या नावे त्या मिळकतीचे एकूण क्षेत्र १३५३ चौ. फूट नमूद करण्यात आले होते.

**१६.** सदर मिळकतीला सन २०११ ते २०१५–१६ पर्यंत ग्रा. मि. क्र.४७६ अशी नोंद झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दरम्यान सदर मिळकतीमध्ये ४ x ३३ आणि ९ x ५० या खुल्या क्षेत्राची नोंद करुन तिचे एकूण क्षेत्र २५१४ चौ. फूट असल्याचे नोंदवून घेतले होते. सदर खुल्या जागेचे क्षेत्र ग्रामपंचायतीच्या ठरावाने माझ्या नावे घेण्यात आले होते. मी त्या ठरावाची कागदपत्रे न्यायालयात पुढील तारखे पर्यंत हजर करु शकतो.

**१७.** ग्रा. मि. क्र.४७६ बाबत रेखा चव्हाण व माझ्यामध्ये एक दिवाणी दावा प्रलंबित होता. या दाव्यातील प्रतिवादी त्या प्रकरणामध्ये पक्षकार नव्हते. रेखा चव्हाण माझ्या आत्या होत्या. तो दावा आमच्यामध्ये तडजोड होऊन निकाली निघाला होता. हे म्हणणे खरे नाही की, तो दावा निकाली निघण्यापूर्वी या दाव्यातील प्रतिवादींनी ग्रामपंचायतीच्या परवानगीने माझ्या मिळकतीच्या पश्चिम बाजूला घराचे बांधकाम पुर्ण केले होते.

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी त्यांच्या घराचे बांधकाम केल्यानंतर मी पुर्वेकडील रिकाम्या जागेमध्ये ४ x ३३ व ९ x ५० जागेमध्ये शेड, स्नानगृह आणि शौचालयाचे बांधकाम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी बळजबरीने शेड व स्नानगृहाचे पत्रे प्रतिवादींच्या जागेतील छपरीवरती ठेवले असून आज देखील तसेच आहे.

**१९.** मी दावा बोळ मिळकती बाबतचा कागदोपत्री पुरावा सादर करु शकत नाही. हे

म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी परीट यांच्याकडून जागा खरेदी करुन त्यांच्या घराचे बांधकाम केले आहे. लक्ष्मण देसाई यांनी परीट यांच्याकडून प्रतिवादींच्या उत्तरेकडील जागा खरेदी केलेली आहे.

प्रश्न – तुम्ही लक्ष्मण देसाई यांना या दाव्याकामी प्रतिवादी म्हणून सामील केलेले नाही ?

उत्तर – लक्ष्मण देसाई यांनी घेतलेल्या जागेतून बोळ सोडलेले असल्यामुळे मी त्यांना या दाव्यात सामील केलेले नाही.

**२०**. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी परीट यांच्याकडून खरेदी घेतलेल्या जागेवरती कंपाऊंड करुन घराचे बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खुल्या जागेत शेड मारल्यामुळे माझ्या जागेतील सांडपाणी बाहेर जाण्यास मला पर्यायी मार्ग नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी त्यांचे सांडपाणी जाण्यासाठी दक्षिणेकडील रस्त्याच्या बाजूने पाईपलाईन केलेली असून त्यातून त्यांचे पाणी जात आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी केलेल्या पाईपलाईन मधून माझे सांडपाणी जाण्याबाबत आमच्यात तडजोड झाल्यामुळे मी त्या पाईपलाईन मधून माझे सांडपाणी सोडले आहे.

**२१**. हे म्हणणे खरे नाही की, सांडपाण्याची जोडणी होईपर्यंत मी प्रतिवादींशी चांगले वागून बोळीच्या जागेवरती मालकीहक्क सांगायला सुरुवात केली आहे. दावा बोळ मिळकत ही माझ्या व रेखा चव्हाण यांच्या सामाईक मालकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, रेखा चव्हाण सोबत मला दावा बोळ मिळकती मधील प्रतिवादींच्या क्षेत्राबाबत आम्हाला तडजोड करण्याचा अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दावा बोळ मिळकतीमध्ये माझा कोणताही अधिकार नाही.

**२२**. मला नि. दि. दा. क्र.६०/२०१२ मधील दाखल केलेली तडजोड पुरसीस व अंतिम हुकूमनामा मान्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दाव्यातील तडजोडी प्रमाणे मला दावा बोळ मिळकती बाबत कोणताही मालकी हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला या प्रतिवादीं विरोधात दावा दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन करत असलेली दावा बोळ मिळकत कधीही अस्तित्वात

नव्हती.

**२३**. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी आमच्या गावचे मूळ रहिवासी नसल्यामुळे मी अरेरावी करुन त्यांच्या भिंतीवरती पत्र्याचे पाणी सोडलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, या दाव्यात नियुक्त केलेल्या न्यायालयीन आयुक्तांशी संगनमत करुन मी खोटा अहवाल दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना त्रास देऊन त्यांची मिळकत बळकावण्यासाठी मी खोटा दावा दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २८.०४.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते